नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१
e-mail:ddtp.ho@maharashtra.gov.in ao.tpvd@maharashtra.gov.in

-: कार्यालयीन आदेश :-

**विषय :** गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) मधील अधिकारी व गट-ब व गट-क (अराजपत्रित) मधील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभाच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भ :** १) मुख्य कार्यालयाचे कार्यालयीन आदेशक्र.विपस बैठक/ प्रशा-१/ ६११६, दि.२४.१०.२०१८.
२)वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१०.
३) मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.आस्था/सुसेआप्रयो/ गट-अ ते गट-क/प्रशा-१/११२०, दि.०१/०३/२०१९.
४) मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.आस्था/सुसेआप्रयो/ गट-अ ते गट-क/प्रशा-१/११२१, दि.०१/०३/२०१९.
५) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.-३/ २०१९/सेवा-३, दि.०२ मार्च, २०१९.

प्रस्तावना

संचालनालयातील गट-अ ते गट-क मधील अधिकारी/कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत दि.३१/१०/२०१८ व २५/०२/२०१९ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक संपन्न झाली आहे. त्यानुसार विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये या संचालनालयातील गट-अ ते गट-क मधील अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय, वित्त विभाग दि.०१/०४/२०१० नुसार १२/२४ वर्षांच्या सेवेनंतर सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला वा दुसरा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार संदर्भ क्र.(३) व (४) अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

०२. वित्त विभागाच्या संदर्भ क्र. (५) दि.०२ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय केली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही **दि.०१/०१/२०१६ पासून अंमलात आली आहे.** ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला

आहे. त्यांना २०(१२+८) व ३०(२४+६) एवढया वर्षांच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार, यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजूर करावयाचा आहे.

दि.०१/०१/२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि.०१/०४/२०१० नुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी/अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे **आदेश रद्द** करुन त्यांना तीन लाभाच्या सुधारित योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्यानुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन, फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## -: आदेश :-

नगर रचना आणि मूल्यधिरिण विभागातील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) मधील अधिकारी व गट-ब व गट-क (अराजपत्रित) मधील कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र.(३) व (४) च्या आदेशान्वये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मंजूर करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र. (५) चे शासन निर्णयातील अटी व शर्तीचा विचार करुन ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या पहिल्या व दुसऱ्या लाभाच्या दिनांकात बदल होत आहेत, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे **संदर्भ क्र.(३) व (४) चे आदेश रद्द करुन** त्यांना सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारित सेवांतेर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा लाभ मंजूर करण्याबाबत संचालक,नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे हे सोबत जोडलेल्या जोडपत्र-"अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सुधारित आदेश निर्गमित करीत आहेत. उर्वरीत अधिकारी/कर्मचारी यांचे बाबत त्यांना संदर्भ क्र.(३) व (४) च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या पहिल्या व दुसऱ्या लाभाच्या दिनांकात कोणताही बदल होत नसल्याने त्यांचेबाबत पूर्वीचेच संदर्भ क्र. (३) व (४) चे आदेश कायम राहतील.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११ (१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाच विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र.११(१) (ए) नुसार केली जाईल.

२०(१२+८) व ३०(२४+६) एवढया वर्षांच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार, यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजूर करावयाचा आहे.

दि.३१/१०/२०१८ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक संपन्न झाली. त्यामध्ये श्री.हेले, सनर यांना १६/१२/२००९ पासून सु.से.आ.प्र.यो.चा पहिला लाभ अनुज्ञेय करण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात आले होते. तर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.७९६/२०१२ मधील आदेशानुसार श्री. गौतम, सनर यांना २२/११/२००५ पासून सु.से.आ.प्र.यो.चा पहिला लाभ व दि.२२/११/२०१७ पासून दुसरा अनुज्ञेय करण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात आले होते. श्री.हेले व श्री.गौतम, सनर यांना लाभ अनुज्ञेय करण्याच्या अनुषंगाने समितीने कागदपत्रांचे आलोकन केले असता श्री.हेले व श्री.गौतम यांच्या विरुध्द दि.२२/११/२०११ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु केली. सदरहू विभागीय चौकशी प्रकरणी शासनाने दि.१९/०५/२०१७ अन्वये "ठपका ठेवणे" ही शिक्षा दिली आहे. त्यामुळे श्री.हेले व श्री.गौतम यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ् अनुज्ञेय करण्याबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन घेण्यात यावे असा समितीचा निर्णय झाला. त्यानुसार मुख्य कार्यालयाचे संदर्भ क्र.(११) चे पत्र क्र.आस्था/सुसेआप्रयो/सनर श्रेणी-१/प्रशा-१/११२३, दि.०१/०३/२०१९ अन्वये शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले. शासन, नगर विकास विभाग पत्र क्र.आप्रयो-१७१९/ ४००/प्र.क्र.४४/नवि-२७, दि.१७/०५/२०१९ अन्वये शासनाने पुढीलप्रमाणे मागदर्शन केले आहे. "ठपका ठेवणे ही शिक्षा सु.से.आ.प्र.यो. चा लाभ लागू करण्याच्या आड येत नाही. तरी आवश्यक ती कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावरुन करण्याबाब कळविले आहे.

उपरोक्त सर्व शासन निर्णय व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.७९६/२०१२ मधील निर्णय विचारात घेऊन नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/ दुसरा लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

<u>सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा लाभ.</u>

सहायक नगर रचनाकार, श्रेणी-१ पदावर कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्यांना **पहिला लाभ** म्हणून नगर रचनाकार (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००/-) मंजूर करण्यात येत आहे. तर सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ शासन निर्णय, वित्त विभाग, दि.२ मार्च, २०१९ मधील तरतुदीनुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली दुसरा लाभ (१२+८)सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३ मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री,रा.भा.हेले, बी.ई.(सि.) | भ.ज.(क) वैध | १६/१२/२००९ | १६/१२/२०१७ | - |
| २ | श्री.वि.का.गौतम, बी.ई.(सि.) | खुला | २२/११/२००५ | ०१/०१/२०१६ | मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.७९६/२०१२ मधील निर्णयानुसार |

वरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा लाभ खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११(१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाच विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. जे अधिकारी/ कर्मचारी सद्यस्थितीत प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांच्या बाबतीत ते प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.

३. वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीत मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. या योजनेअंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी मिळाली तरी उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांची नावे (मूळ) कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतच राहतील.

४. उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांना भविष्यात पदोन्नती दिल्यानंतर जर त्यांनी पदोन्नती नाकारली किंवा ते नियमित पदोन्नतीस अपात्र ठरले तर, पदोन्नती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्याच्या दिनांकापासून त्यांना या योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र त्यापूर्वी देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली करण्यात येणार नाही

५. शासन निर्णय दि.१ जुलै २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर अधिकारी/ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

६. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे.)

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/गट-अ ते गट-क/प्रशा-१/४५२५
मध्यवर्ती कार्यालय, पुणे – ४११ ००१
दिनांक - ०५/०९/२०१९

(स.वा.आवजी)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा.महालेखापाल, मुंबई-१/नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१. सहसंचालक, नगर रचना, अं.क. पुणे/ कोकण विभाग.
२. सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.
   श्री.रा.भा.हेले, सहायक नगर रचनाकार, अंबरनाथ नगरपरिषद येथे व श्री.वि.का.गौतम, सहायक नगर रचनाकार हे कुळगाव बदलापूर नगरपरिषद येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असल्याने त्यांना देय होणाऱ्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या लाभाच्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद/ कुळगाव बदलापूर नगरपरिषद.
४. कोषागार अधिकारी, . ------------------
५. श्री.रा.भा.हेले, अंबरनाथ नगरपरिषद (विहित मार्गे)
६. श्री.वि.का.गौतम, कुळगाव बदलापूर नगरपरिषद (विहित मार्गे)
७. कार्यासन अधिकारी, प्रशा-१/प्रशा-१अ/प्रशा-१ब/प्रशा-२/अर्थसंकल्प/लेखा.
८. श्री.पालकर, उच्चश्रेणी लघुलेखक/श्रीमती हुपरे, उच्चश्रेणी लघुलेखक.
९. वैयक्तिक धारिका.
१०. संशोधन अधिकारी, ना.सं.घ./ रा.ना.भा.च.कस. प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.
११. श्री.जाधवर,व.लि. प्रस्तुत आदेशामध्ये देण्यात आलेल्या सु.से.आ.प्र.योजनेच्या लाभाची नोंद जेष्ठता सूचीमध्ये घेण्यात यावी.

E:\SSJ\Final_TimeBond_Promotion_2018\Revised_TimeBond_02_03_2019\Revised_02_03_2019\Revised_TimeBondOrder_02032019.docx